## सन 2002 पुर्वी नोंदणीस सादर परंतु प्रलबित दस्त नोदंणी करुन परत देणे

Complete Registration & delivery of Documet presented before 2002 but which kept pendig

### विषय ओळख (About)

दुय्यम निबंधक कार्यालयात सन 2002 पासुन दस्त नोदंणी ही संगणकीय पध्दतीने होत असुन, त्याद्वारे दस्त नोंदणी तहकुब ठेवणेची तरतुदच नसल्याने, तेव्हापासुन दस्त नोंदणीस प्रलबित नाहीत. परंतु तत्पुर्वी, विविध कायदयातील तरतुदीनुसार उदा, आयकर, युएलसी इ. नुसार दस्त नोदंणीसाठी परवानग्या आवश्यक होत्या, परंतु त्या दस्त नोदंणीस सादर होतांना उपलब्ध करुन न दिल्याने असे दस्त नोंदणीवर तहकुब ठेवण्यात आलेले होते.

परंतु असे दस्त ज्या कारणांसाठी तहकुब ठेवण्यात आलेले आहेत, त्याची माहीती प्रत्यक्ष दुय्यम निबंधक कार्यालयात जाउन घेणे आवश्यक आहे. तहकुबीच्या कारणांची पुर्तत संबधितांनी केल्यास किंवा दस्तावर कमी मुद्रांक शुल्क असल्यास, ते भरल्यास असे दस्त नोदंणीस आदेशीत केले जातात. अशा दस्ताची नक्कल केल्यांनतर, दस्त नोदंणीस सादर करणा-या पक्षकारास असे दस्त सपुर्द केले जातात. यासंबधात अधिक माहीतीकरीता, सारथी < दस्त नोंदणी< इतर काही महत्वाच्या बाबी<जुने प्रलबित दस्त पहावे.